# "महाराष्ट्रातील स्त्री उध्दार कार्यात सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

## (विशेष संदर्भ : इ. स. १८४० - १९००)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.**

**मानव्य विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी**

**सादर करण्यात आलेला शोध-प्रबंध आराखडा**

**संशोधक**

**क्षमता दादाराव वाढवे**

एम. ए. इतिहास, नेट

**मार्गदर्शक**

**डॉ.सुभाष गणपत बेंजलवार**

सहा. प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, लातुर

**सप्टेंबर - २०२२**

# “महाराष्ट्रातील स्त्री उध्दार कार्यात सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास”

## (विशेष संदर्भ : इ. स. १८४०-१९००)

---

**प्रस्तावना :-**

एकोणिसाव्या शतकात भारतातील ब्रिटिश अंमल जसजसा स्थिरावत गेला, तसतशी ब्रिटिशांच्या संपर्कामुळे पाश्चिमात्य उदारमतवादाची ओळख नवशिक्षित भारतीयांना होत गेली. ब्रिटिशांनी आधुनिक शिक्षणाचा पाया घातला आणि सर्व जाती-धर्मातील लोकांना शिक्षण खुले केले. कनिष्ठ जातीतील लोकांच्या दृष्टीने व स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने ही घटना दूरगामी परिणाम साधणारी होती; परंतु भारतीय समाज जाती, धर्म, वर्ण व्यवस्थेने गुरफटलेला असल्याने तळागळातील स्त्री व शुद्रातिशुद्र हा वर्ग शिक्षणाच्या मूलभूत अधिकारापासून उपेक्षित होता. भारतातील बुध्दीप्रामाण्यावाद्यांनी सामाजिक सुधारणेच्या प्रयत्न केला; पण त्यांना धर्मग्रंथशास्त्राचे बंधने होती. या उलट जोतीराव फुले यांनी धर्म चिकित्सेचे महत्त्व ओळखले होते. महाराष्ट्रात वर्ण-जाति व्यवस्थापक शोषणात ब्राम्हणी धर्माची भूमिका ही कळीची होती, म्हणून त्यांनी ब्राम्हणी धर्माच्या चिकित्सेची भूमिका घेतली व पर्यायी जातिव्यवस्थेचा अंत व पर्यायी संस्कृतीची स्थापना हे आपल्या कार्याचे उद्दिष्ट ठरविले आणि स्त्री-पुरुष समता, जातीनिर्मूलन, ज्ञाननिर्मिती, धर्मचिकित्सा, संसाधनांचे फेरवाटप, सामाजिक न्याय आणि आंतरजातीय विवाह या कृतीकार्यक्रमांद्वारे त्यांनी पर्यायी सामाजिक संस्कृतीचा पाया घातला.

महाराष्ट्रात जातीभेद, स्पृश्य-अस्पृश्यतावाद, अंधश्रध्दा, ब्राम्हणांचे सर्वच क्षेत्रात सत्ताश्रेष्ठत्व, समता, बंधुता व स्वातंत्र्य या मानवी हक्कांचे प्रामुख्याने खुल्या शिक्षणाचा अभाव या सा-या अवगुणांमुळे मराठी समाज मरगळल्यासारखा झाला होता. ही दयनीय परिस्थिती बदलण्यासाठी

आमुलाग्र सामाजिक क्रांती झाली पाहिजे, अशी व म. जोतीराव फुले यांची खात्री झाली होती; आणि हे साध्य करण्यासाठी सार्वत्रिक शिक्षण हेच एकमेव शस्त्र आहे. या तत्वाचा स्वीकार करुन स्त्री, शुद्र-अतिशुद्र यांच्या शैक्षणिक हक्कांचा एल्गार पुकारला आणि या कार्याला सर्वस्वी वाहून घेतले. म. फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात सर्वप्रथम सावित्रीबाईना शिक्षित करुन प्रस्थापीत ब्राम्हणी व्यवस्थेला छेद दिला. 'स्त्री शिक्षण' हे अत्यंत मोलाचे आहे, म्हणून म.फुले आणि त्यांचे बहुजन व ब्राम्हण सहकारी यांनी १८४८ साली पुण्यात 'नेटिव्ह फिमेल स्कूल्स' ही स्त्री शिक्षण संस्था स्थापन केली. शिक्षण हा स्त्रियांचा 'मानवी अधिकार' आहे आणि समग्र देशाची उन्नती स्त्री शिक्षणाविना शक्य नाही, हे मुलभूत तत्वज्ञान घेउुन फुले दाम्पत्य सदर काम करीत होते. १८५३ मध्ये 'ज्ञानोदय' ह्या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये मुलींच्या शिक्षणासंबंधी आपली भूमिका मांडताना म. फुले म्हणाले की, 'प्रथम मनात आले की, आईच्या योगाने मुलांची जी सुधारणूक होते ती फारच उत्तम व प्रगल्भ असते, म्हणून मुलीचीच शाळा प्रथम काढली; तर स्त्रियां शिकल्या तर धर्म बुडेल, संस्कृती रसातळाला जाईल, चूल आणि मूल सांभाळणा-या स्त्रियांना शिक्षणाची काय गरज? असे सनातनी विचार होते. परंतु सनातन्यांचा बालेकिल्ला असलेल्या पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात काढलेली मुलींची पहिली शाळा म्हणजे 'समतामूलक' समाज प्रस्थापनेचे पहिले पाऊल ठरले. 'शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. हे तत्व सतत डोळ्यासमोर ठेवून फुले दाम्पत्यानी १८४८-१८५२ या काळात १८ शाळा सुरु केल्या होत्या. वाचनालय, साक्षरता अभियान, विधवांच्या केशवपनाला विरोध म्हणून न्हाव्याचा संप, विधवा विवाहाचा कायदा, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, शेतकरी - शेतमजुर, कामगार स्त्री-पुरुषांसाठी रात्रशाळा, अनाथ बालिकाश्रम, दुष्काळग्रस्तांसाठी अन्नछत्रात व अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरातील विहीर पाणी पिण्यासाठी खुली करुन जाती निर्मूलनाच्या कार्याला थेट हात घातला होता. या सर्व कार्यात सावित्रीबाई फुले म. फुलेच्या बरोबरीने सहभागी होत्या. सावित्रीबाईनी 'महिला सेवा मंडळांची' स्थापना केली. या संस्थेच्या अध्यक्षपदी पुण्याच्या कलेक्टरच्या पत्नी

ई.सी.जोन्स यांना नियुक्त केले आणि सर्व जाती-धर्मांच्या स्त्रियांमध्ये सामाजिक स्नेह-सलोखा वाढविण्यासाठी प्रेरणा दिली.

महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर सर्वांसाठी एकच 'सार्वजनिक सत्यधर्म' सांगितला. सर्वांना समान हक्क असावेत. मूर्तिपूजा, नामस्मरणाचीही गरज नाही. दीनदुबळ्या लोकांची सेवा म्हणजेच ईश्वरची पूजा. "अशा सत्य, न्याय, समानता, बंधुता व मानवतेवर आधारलेल्या समाजनिर्मितीचे ध्येय महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजासाठी निश्चित केले. सत्यशोधक चळवळ ही सामाजिक, धार्मिक गुलामगिरी विरोधातील असून या समाजाने भट- भट नाकारुन साध्या पध्दतीने हुंड्याशिवाय, कमी खर्चातील विवाह लावण्याचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह २५ डिसेंबर, १८७३ रोजी लावण्यात आला. नंतर ही चळवळ देशव्यापी झाली. देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासातल्या धार्मिक परंपरा नाकारुन त्या विरोधात विद्रोह करणारे पाऊल सत्यशोधक समाजाने उचलले. त्यामध्ये सावित्रीबाईंचा पुढाकार होता. सावित्रीबाईंची मैत्रीण बजूबाई ग्यानोबा निंबणकर यांची कन्या आणि महात्मा फुले यांचे कार्यकर्ते सीताराम जबाजी आल्हाट यांच्या विवाहासाठी सावित्रीबाई आणि बजूबाई निंबणकर यांनी भरपूर कष्ट घेतले. अशा पध्दतीच्या विवाहांना भटजींनी भरपूर विरोध केला, कोर्ट-कचे-या झाल्या. सावित्रीबाई-जोतिबांना अपार कष्ट सोसावे लागले; पण ते डगमगले नाहीत त्यांनी आपला दत्तकपुत्र यशवंत याचा विवाह याच पध्दतीने केला.

फातिमा शेख भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षकांपैकी एक होत्या, त्यांनी सत्यशोधक चळवळीत सावित्रीबाई फुले यांच्या सोबत शेवटपर्यंत योगदान दिले. जोतीराव-सावित्रीबाईच्या तालमीत तयार झालेल्या सत्यशोधक ताराबाई शिंदे यांनी जगातले पहिले स्त्रीवादी पुस्तक 'स्त्री-पुरुष तुलना' लिहिले. तसेच चौथीच्या वर्गात शिकणा-या मुक्ता साळवे या मातंग विद्यार्थिनीने १८५५ साली 'मांगमहारांच्या दुःखाविषयी' लिहिलेला निबंध म्हणजे विषमतेवर आधारलेल्या जातीव्यवस्थेचे वास्तव चित्रण यामध्ये सामावलेले आहे. तान्हुबाई बिर्जे भारतातील पहिली महिला संपादक (१९०६) होत्या, तर सावित्रीबाई

रोडे ह्या रामोशी समाजातील यांनी १९१४ साली 'रामोशी समाचार' यामधून स्त्री व दलितांच्या व्यथांना वाचा फोडून सत्यशोधकीय चळवचळीचे नेतृत्व केले.

सत्यशोधक चळवळीच्या सुरुवातीपासूनच यामध्ये सावित्रीबाईचा सहभाग होता. यानंतरही परिवर्तनाची मूल्ये घेऊन ध्येयप्रेरित झालेल्या अनेक स्त्रियां यामध्ये दिसतात. काहींनी प्रत्यक्ष कार्य केले, तर काहींनी त्या कार्याला अप्रत्यक्षपणे हातभार लावला. अशा सर्व स्त्रियांनी सत्यशोधक समाजाच्या प्रबोधनाचे कार्य पुढे नेले. यामध्ये लक्ष्मीबाई नायडू, कमलाताई विचारे, सावित्रीबाई रोडे, विमलताई देशमुख, विमलताई बागल, नलिनीताई लढके, लक्ष्मीबाई पाटील, इंदुमती राणीसाहेब, तानुबाई बिरजे, शांताबाई बनकर, जनाबाई रोकडे, अहिल्याबाई रोकडे, चंद्राबाई बागल, शरदाबाई पवार व सुमतीताई पाटील यांच्या सारख्या अनेक स्त्रियांनी सत्यशोधक चळवळीच्या हातभार लावत सत्यशोधकीय विचार घरात, कुटूंबात, समाजात रुजविण्याचा पुरेपुर प्रयत्न केला.

## संशोधन विषयाची निवड :-

महात्मा फुले यांचे सम्रग जीवन हे 'समता' प्रस्थापित करण्यासाठी गेले. भारतीय व महाराष्ट्रातील समाजात रुजलेल्या विषमतेच्या तत्वांना त्यांनी समूळ नष्ट करण्यासाठी 'सत्यशोधक समाजाची' निर्मिती केली. याद्वारे त्यांनी समाजातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरेला विरोध करीत समतेवर आधारलेली एक नवी पर्यायी संस्कृती उभी केली. ज्यातून हिन-दिन अशा स्त्री व शुद्रा-अतिशुद्र अशा बहुजन समाजाचे स्वातंत्र, समता, बधुंता व न्याय हक्कांची प्रस्थापना केली. ज्यामुळे लिगभान, जाती व वर्ण व्यवस्थेच्या बळी पडलेल्या स्त्रियांना आपल्या उन्नतीचा नवा मार्ग मिळाला. प्रस्तुत शोध प्रबंधात सत्यशोधक समाजाच्या कृतीकार्याची व सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, फातिमा शेख, मुक्ता साळवे आदी सारख्या खंभीर सत्यशोधिकांच्या स्त्री उध्दार कार्याचे योगदान तसेच पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचे होणारे शोषण हे केवळ सत्ता व संपत्तीसाठी टिकविण्यासाठी त्यांना दुय्यम दर्जात्मक वागणूक देण्यात येत होती; परंतु सत्यशोधक समाजातील स्त्रीयांना या व्यवस्थेला सुरुंग लावला. आणि 'स्त्री-

पुरुष समानता’ ही तत्वे अंमलात आणली. अशा सर्व सत्यशोधक समाजातील स्त्रीयांच्या कार्य कर्तृत्वाचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

१) आधुनिक महाराष्ट्रातील पितृसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीयांच्या दुय्यममत्वाची कारणमिमांसा अभ्यासणे.

२) महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री उध्दारक कार्याचा आढावा घेणे.

३) सत्यशोधक चळवळीत सहभागी स्त्रीयांनी केलेल्या ‘स्त्री सुधारणा’ कार्याचा अभ्यास करणे.

४) सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांच्या साहित्यकृतीतून आलेल्या स्त्रीदास्यत्वाची चिकित्सा करणे.

५) सत्यशोधक चळवळीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी झालेल्या सर्व स्त्रीयांच्या योगदानाचा आढावा घेणे.

**गृहितके :-**

१) सत्यशोधक समाजाचे ‘समताधिष्ठीत समाज’ निर्माण करणे हे मूलतत्व राहिले.

२) सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांनी प्रस्थापीत पुरुषप्रधान संस्कृतीला आव्हान दिले.

३) सत्यशोधक चळवळीत स्त्री उध्दारासाठी झटणा-या उपेक्षित स्त्रियांना प्रवाहात आणणे.

४) सत्यशोधक चळवळीतील सुधारकांचा स्त्री सुधारणावाद हा ‘स्त्री-पुरुष’ समानता या तत्वावरती आधारलेला होता.

५) सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांनी साहित्याच्या माध्यमातून स्त्री सुधारणा कार्याला भक्कम केले.

## संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

“महाराष्ट्रातील स्त्री उध्दार कार्यात सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : इ. स १८४०-१९००) प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्र या प्रदेशापुरती मर्यादित आहे. सदरील संशोधनात महाराष्ट्रातील स्त्री सुधारणेसाठी ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्यभर कृतीयुक्त वैचारिक मंथन केलेले सत्यशोधक फुले दाम्पत्य व त्यांचे बहुजन समाजातील

स्त्री-पुरुष सहकारी यांच्या कार्याचा वस्तुनिष्ठ व विस्तृत आढावा घेण्यात येणार आहे. तसेच सत्यशोधक समाज स्थापनेमागील उद्देश व त्यामध्ये सहभागी स्त्रियांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष योगदानाची वस्तुनिष्ठ मिमांसा करण्यात येणार आहे. केवळ महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीतील स्त्रीयांच्या स्त्री उध्दारक कार्याचा आढावा घेणे, हेच या संशोधनाची मर्यादा आहे.

## संशोधन पध्दती :-

"महाराष्ट्रातील स्त्री उध्दार कार्यात सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ:इ.स.१८४०-१९००) प्रस्तुत संशोधन हे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सत्यशोधकीय स्त्रीविश्वातील सर्वगामी परिवर्तनाचा वेध घेणारे आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाकरीता किंवा सत्य शोधून काढून नवीन ज्ञानाची भर घालण्याकरीता वस्तुनिष्ठ व शास्त्रशुध्द अशा ऐतिहासिक व सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

## संशोधन विषयाचे महत्त्व :-

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुरोगामी कृतीप्रवण परिपेक्ष्यात सत्यशोधक चळवळ उभी राहिली. जात, वर्ण आणि लिंगभाव या शोषण केद्रांवर सत्यशोधक चळवळीतील स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी हल्ला चढविला. स्त्रियांच्या उपेक्षित जगण्याला 'शिक्षणा'च्या अधिकाराने वाचा फोडली आणि सृजनशील समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सत्यशोधकीय स्त्रियांनी स्वतः आणि आपल्या भगिनींच्या दास्यत्वांच्या मुक्ति मार्गाचे प्रत्यक्ष कृतीतून व साहित्यातून आत्मभानाचा वैचारिक वारसा तयार केला. सत्यशोधक चळवळीच्याद्वारे स्त्रियांनी प्रस्थापीत सामाजिक मानसिकतेला, धर्मांध्दपणाला, विषयमतेच्या तत्वांना मुठमाती देत, आजच्या समाज जीवनाला परिवर्तनीय प्रेरणा प्रदान केली. हे या संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

**प्रकरण योजना :-**

“महाराष्ट्रातील स्त्री उध्दार कार्यात सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास” (विशेष संदर्भ: इ.स.१८४०-१९००) या संशोधन विषयाचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून आकलन होण्यासाठी व वस्तुनिष्ठ निष्कर्ष शोधून काढण्यासाठी या शोध प्रबंधाची पाच प्रकरणांत विभागणी करण्यात आलेली आहे.

**प्रकरण पहिले : प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे. सोबतच ब्रिटिशांच्या आगमनानंतर सामाजिक जिवनात झालेल्या सुधारणाचा विशेषतः ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर चळवळीच्या माध्यामातून स्त्रियांच्या प्रगती व प्रगल्भतेच्या दृष्टीने मीमांसा करण्यात येणार आहे.

**प्रकरण दुसरे : सत्यशोधक समाज उदय व विकास**

महात्मा जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापने मागील उद्देश व महत्त्व लक्षात घेऊन पर्यायी संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे तळागाळातील शुद्रातीशुद्र व स्त्रियां यांच्या उपेक्षितपणाला न्याय मिळवून दिला. याविषयी या प्रकरणात सविस्तर आढावा घेण्यात येईल.

**प्रकरण तिसरे : सत्यशोधक समाजातील स्त्रियांचे स्त्री सुधारणा कार्यातील योगदान**

सत्यशोधक समाजाच्या तत्वप्राणाली नुसार बहुजन समाजातील असंख्य स्त्रियां प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्त्री सुधारणासाठी कार्यकरत होत्या. त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.

**प्रकरण चौथे : सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे साहित्य लेखनः स्त्री दास्यमुक्तीची प्रेरणा**

सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांनी चूल आणि मूल ही पितृसत्ताक पध्दती झुगारुन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. समाजामधील स्त्रीदास्यत्व नष्ट

करण्यासाठी आपल्या लेखनीने समाजजागृतीचे कार्य केले. ज्यामध्ये सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, फातिमा शेख, मुक्ता साळवे आणि इतरही स्त्रियांच्या साहित्यांचा अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण पाचवे : उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनांती समाजोपयोगी, वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्यात येतील.

## संदर्भग्रंथ सूची :-


१. नरके हरी (संपा)., महात्मा फुले समग्र वाङ्मय, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, २०१३

२. नरके हरी (संपा)., आम्ही पाहिलेले महात्मा फुले, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, अकरावी आवृत्ती, २००८

३. नरके हरी (संपा)., महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, आठवी आवृत्ती, २०१८

४. माळी मा. गो. (संपा)., क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै २००६.

५. भालेराव इंद्रजित, महाराष्ट्राचे शिल्पकार ताराबाई शिंदे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, डिसेंबर २००८.

६. माळी मा.गो. (संपा)., सावित्रीबाई फुले-समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, जुलै २०११.

७. फडके भालचन्द्र, फुले-आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८५.

८. बगाडे उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातिप्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६

९. कीर धनंजय, म.जोतीराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,

प्रथमावृत्ती, १९६८.

१०. मून मीनाक्षी, (संपा)., फुले-आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, मार्च २०१४.

११. कुलकर्णी अ.रा., महात्मा जोतीराव फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, द्वित्तीयावृत्ती, ऑक्टोबर २०१७.

**संशोधक विद्यार्थीनी**

**क्षमता दादाराव वाढवे**

एम. ए. इतिहास, नेट

**मार्गदर्शक**

**डॉ. सुभाष गणपत बेंजलवार**

सहा. प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, लातुर